# प्रेसनोट  दिनांक  २५/०४/२०१९

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

## पोलीसांच्या अंगावर धावुन जाणा-या इसमास अटक

दिनांक २४/०४/२०१९ रोजी सोमवार पेठ बिट मार्शल पोलीस शिपाई हेमंत पेरणे व पोलीस शिपाई भोर हे जुनी जिल्हा परिषद कडून नरपतगिरी चौकाकडे पेट्रोलिंग करीत असताना मंगळवार पेठ, पुणे याठिकाणी सार्वजनिक रोडवर लोकांची गर्दी जमलेली दिसली. यामुळे त्यांनी तेथे जावून पाहिले असता त्याठिकाणी सुरु असलेल्या एसआरए प्रोजेक्ट येथे दोन इसम हे एका इसमास मोठमोठ्याने शिवीगाळी करीत त्याचे अंगावर मारण्यासाठी धावून जात होते. बिट मार्शल यांनी त्यांना अटकाव करुन त्यांना जवळच असलेल्या नरपतगिरी पोलीस चौकी येथे नेले.

नरपतगिरी पोलीस चौकीत चौकी प्रभारी अधिकारी श्री. पोउपनि.शिवाजी भोसले व समर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. विनायक साळुंखे हे हजर होते. ते सदर इसमांकडे चौकशी करीत असताना १९/२५ वा. चे सुमारास एक इसम अचानक चौकीत आला व अधिकारी करीत असलेल्या चौकशीमध्ये मोठमोठ्याने बोलून अडथळा निर्माण करु लागला. त्यावेळी त्यांना ज्यांची तक्रार आहे त्यांनी थांबा व इतरांनी बाहेर थांबा असे सांगत असताना संबंधित इसम हा पोउपानि श्री. भोसले साहेब यांचेशी हुज्जत घालू लागला त्याला तो पोलीस करीत असलेल्या शासकीय कामामध्ये अडथळा आणू नका असे समजावण्याच्या प्रयत्न केला असता सदर इसम हा त्यांचे न ऐकता पोलीसांच्या बरोबर आरेरावी करुन भोसले साहेबांचे अंगावर धावून गेला व मी बाहेर जाणार नाही काय करायचे ते करा व मी पण कोण आहे हे तुला दाखवतो अशी दमबाजी करु लागला. त्यावेळी सोमवार पेठ बिट मार्शलला असणारे कर्मचारी हे त्यास समजावून बाहेर थांबावण्याचा प्रयत्न करीत असताना तो इसम पोशि पेरणे यांच्या अंगावर धावून येवून तु मध्ये बोलू नकोस तु शिपुरडा आहेस असे बोलून मी तुझ्या अधिका-यांशी बोलतोय ना असे बोलून पोशि नलावडे यांना जोरात ढकलून देवुन त्यांना इजा पोहचवली.

सदर इसमास बिट मार्शल व चौकीचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी ताब्यात घेवून समर्थ पोलीस ठाणे येथे घेऊन जाऊन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव रविंद्र कांतिलाल साठे  वय- ३७ वर्षे, रा. सोमवार पेठ, पुणे सध्या राहणार, हडपसर पुणे असे असल्याचे  सांगितले. सदर इसमास पोलीस अधिकारी व कर्मचारी हे करीत असलेल्या सरकारी कामामध्ये त्यांचे अंगावर धावुन जाऊन त्यांना धक्काबुक्की करुन अडथळा निर्माण केला म्हणून त्याचेविरुद्ध सोमवार पेठ बिट मार्शल पोशि हेमंत पेरणे यांनी भादवि कलम ३५३, ३३२ प्रमाणे फिर्याद दिल्याने गुरनं.१२६/१९ हा नोंद करुन त्यामध्ये सदर इसमास अटक करुन मा. न्यायालयास हजर केले असता त्याची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे.